# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# Savitribai Phule Pune University
(Formerly Pune University)

शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
दुरध्वनी क्रमांक : ०२०–२५६२११८८/८९
ई मेल : affiliation@pun.unipune.ac.in
संकेतस्थळ : www.unipune.ac.in

Academic Section (Affiliation Unit)
Ganeshkhind, Pune - 411007
Phone : 020-25621188/89
Email : affiliation@pun.unipune.ac.in
Website : www.unipune.ac.in

संदर्भ क्रं. सीए/६१४–४

दिनांक : २०/०६/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य,
विद्या एज्युकेशन सोसायटी, एस के डी विधी महाविद्यालय,
धानोरे, ता.येवला, जि.नाशिक ४१२ १०५
[CLWN022370]

विषय : शैक्षणिक वर्ष २०२६–२७ या वर्षाकरिता संलग्नीकरणाचे नूतनीकरण/नैसर्गिक वाढीबाबत ...

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयासंदर्भात विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार, आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२६–२७ करीता खालील रकान्यात नमूद केलेल्या अभ्यासक्रमांच्या संलग्नीकरणाच्या नूतनीकरण/नैसर्गिक वाढीस महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ तसेच विद्यापीठ अनुदान आयोग/संबंधित शिखर संस्था/परिषद/नियामक मंडळ, केंद्र शासन, महाराष्ट्र शासन आणि प्रस्तुत विद्यापीठ यांचेकडून वेळोवेळी विहीत करण्यात आलेल्या आणि येणा–या नियम/आदेश/मार्गदर्शक तत्वे/परिनियम/अध्यादेश इत्यादींमधील तरतुदींच्या अधीन राहून त्याचप्रमाणे प्राचार्य, ग्रंथपाल, शारिरीक शिक्षण संचालक इ. लागू पदे तात्काळ कायमस्वरुपी नियमित प्रक्रियेने भरुन त्यास विद्यापीठाची मान्यता घेण्याची पूर्तता सदर पत्र निर्गमित झालेल्या दिनांकापासून पुढील ३ महिन्याच्या आत पूर्ण करण्याच्या अटीवर परवानगी देण्यात येत आहे. (तीन महिने संपण्याचा कालावधी : दिनांक २० सप्टेंबर, २०२६)

| अ.क्र. | अभ्यासक्रमांचा तपशील | विद्यार्थी संख्या | वर्ष व तुकडी | संलग्नीकरणाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| १. | बॅचलर ऑफ लॉज (एल.एल.बी.) तीन वर्ष | ६० | वर्ष प्रथम व द्वितीय - Div No.1 | नूतनीकरण |
| २. | बॅचलर ऑफ लॉज (एल.एल.बी.) तीन वर्ष | ६० | वर्ष तिसरे - Div No.1 | नैसर्गिकवाढ |

प्रस्तुत विद्यापीठाकडून यापूर्वी वेळोवेळी आपणास कळविण्यात आलेल्या त्रुटींची पूर्तता विहित कालावधीमध्ये न केल्यास आणि बृहत आराखडयानुसार महाविद्यालय ज्या बिंदुवर मान्यता मिळून स्थापन झाले आहे, त्याच जागेवर कार्यरत असणे अनिवार्य असून याबाबतची वस्तुस्थिती विपरीत आढळल्यास शैक्षणिक वर्ष २०२६–२७ करीता देण्यात आलेले संलग्नीकरणाचे नुतनीकरण/नैसर्गिक वाढीबाबतचे पत्र रद्द करण्याबाबतची पुढील आवश्यक ती विहीत प्रशासकीय प्रक्रिया सुरु करण्यात येईल. तसेच आपल्या महाविद्यालयाविरुध्द महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदींनुसार तसेच सन २०१९ चे एकरुप परिनियम क्र.१ नुसार कारवाई करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सोबत देण्यात आलेल्या विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र/हमीपत्र ७ दिवसात सादर न केल्यास शैक्षणिक वर्ष २०२६–२७ करीता देण्यात आलेले संलग्नीकरणाचे नुतनीकरण/नैसर्गिक वाढीबाबतचे सदरचे पत्र रद्द करण्याबाबतची पुढील आवश्यक ती विहीत प्रशासकीय प्रक्रिया सुरु करण्यात येईल.

आपला,

(प्रदिप कोळी)
उपकुलसचिव
(अतिरिक्त कार्यभार)

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित –**
मा.अध्यक्ष/सचिव, संबंधित महाविद्यालयाचे/मान्यताप्राप्त परिसंस्थेचे व्यवस्थापन पाहणारी संस्था